# दादाभाई नौरोजी :
# राष्ट्रवादी विचारधारेतील एक भारतीय विचारवंत

डॉ. सौ. वीरा मांडवकर
सहायक प्राध्यापक, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
इ मेल : pavanmandavkar@yahoo.com भ्रमणध्वनी ९४०३०१४८८५

## सारांश :

इ.स. 1789 च्या फ्रेंच राज्यक्रांतीनंतर एकोणिसावे शतक हे आधुनिकतेचे मानण्यात येऊ लागले. भारतीयांसमोर आधुनिक राष्ट्राचे चित्र स्पष्ट असले तरी पारतंत्र्यामुळे आणि भारतातील वर्ण व्यवस्थेमुळे ते प्रत्यक्षात उतरवणे कठीण होते. ब्रिटीशांचा वसाहतवाद आणि जाती-धर्म व्यवस्थेचा काच या दोन्ही विरोधात नवतरुण जागृत होऊ लागले. सनदशीर राजकारण करणाऱ्यांमध्ये दादाभाई नौरोजी यांची राष्ट्रवादी विचारसरणी सकल राष्ट्रास मार्गदर्शक ठरली. इ.स. 1854 मध्ये प्रोफेसर पद मिळालेले ते पहिले भारतीय होते. आपले शिक्षण देशवासीयांच्या पैशातून झाले असल्याने देशाची सेवा करून ऋण फेडणे आपले कर्तव्य आहे, असे त्यांचे मत होते. भारताचे व इंग्लंड चे संबंध परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत, आपण जे योग्य आहे व न्याय्य आहे ते मागितले तर ब्रिटिश शासन ते दिल्यावाचून राहणार नाही, असे त्यांचे मत होते. त्यांना 'आधुनिक भारताचे पितामह' म्हणून संबोधले जाते. ते नेमस्त उदारमतवादी विचारवंत होते. त्यांनी जनतेला स्वराज्य मंत्र दिला. देशातील संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे जात असल्याने देश दरिद्री बनला, असे मत त्यांनी आपल्या 'Poverty and unbritish rule in India' या पुस्तकात म्हटले. दादाभाई नौरोजींची 'ड्रेन थेअरी' म्हणजेच 'संपत्तीचा निचरा' प्रसिद्ध आहे.

## Abstract:

After the French Revolution of 1789, the nineteenth century was considered as modern era. Although the picture of the modern nation was clear to the Indians, it was difficult to get it done due to the British rule and classism in India. Against both the colonialism of the British and the caste system, a new awakening arose in young generation. Dadabhai Naoroji's nationalist ideology became a guide to the entire nation among the politicians. He was the first Indian to receive the post of professor in 1854. Since his education was from the money of the citizens, he believed that it was our duty to serve the country and pay the debt. He said that the relations between India and England are not contradictory but mutual. He argued that if we demand what is right and fair, the British Government will give it. He is referred to as 'the father of modern India'. He was a fairly liberal thinker. He gave Swarajya Mantra to the people. He said in his book 'Poverty and unbritish rule in India' that the country was becoming poorer as the wealth flows to England. Dadabhai Nauruji's 'Drain Theory', the 'drainage of wealth' is famous.

## प्रस्तावना :

इ.स. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीनंतर एकोणिसावे शतक हे आधुनिकतेचे मानण्यात येऊ लागले. नवनवीन शोध लागल्यामुळे औद्योगिकरणाला प्रारंभ झाला. पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये वाहू लागलेले आधुनिकीकरणाचे वारे भारतावरही परिणाम करू लागले. भारतात त्याही काळात भक्ती चळवळीने सखल भारतीयांना शहाणे करण्याचा प्रयत्न चालविला होता. आधुनिकीकरणाची ही लाट मात्र भक्ती चळवळीपेक्षा वेगळी होती. भांडवलशाही, लोकशाही, नागरी समाज याबाबत यूरोप आधुनिक होत होता. पण ब्रिटिशांचीच वसाहत असलेल्या भारतात पारतंत्र्यामुळे प्रगतीस अडथळे येत होते. भारतातील नवशिक्षित लोकांना जागतिक आधुनिकीकरणाची चाहूल लागली होती. ही आधुनिकता, विकास, औद्योगिकरण भारतात व्हावे यासाठी ते प्रयत्नशील झाले.

नवशिक्षित तरुणांनी जागतिक स्तरावर होणाऱ्या प्रगतीचा आढावा घेतला. त्यावरून भारतात कोणकोणत्या पातळ्यांवर विकास व्हावा, याचे चित्र बनविण्यास त्यांनी सुरुवात केली. त्यात खालील गोष्टींचा अंतर्भाव होता.

१. समाजाची उन्नती करणारी मध्ययुगीन भारताहून वेगळी गुणात्मक व वैधानिक राज्यसंस्था निर्माण व्हावी.

२. पारंपरिक शेतीव्यवसायाबरोबरच तेवढीच महत्त्वाची भांडवली व्यवस्था निर्माण व्हावी.

३. स्वातंत्र्य, समता व बंधुता यावर आधारित समाज निर्माण व्हावा.

भारतीयांसमोर आधुनिक राष्ट्राचे हे चित्र स्पष्ट असले तरी पारतंत्र्यामुळे ते प्रत्यक्षात उतरवणे कठीण होते. ब्रिटिश पक्के वसाहतवादी होते. आपल्या अधिपत्याखाली असलेल्या वसाहतीतून केवळ स्वत:चा फायदा पाहणे हेच त्यांचे उद्दिष्ट होते. वसाहतीच्या प्रगतीविषयी त्यांना कुठलीही आस्था नव्हती.

भारतातील वर्णव्यवस्था हीसुद्धा विकासाला मारक होती. विविध धर्म, जाती, पंथ, त्यांच्या अस्मिता या जंजाळातून प्रगती साधणे अवघड होते. ब्रिटिशांचा वसाहतवाद आणि जातिधर्मव्यवस्थेचा काच या दोन्हीविरोधांत नवतरुण जागृत होऊ लागले. जनआंदोलनांनी जोर धरला. यात अनेक समाजसुधारक, विचारवंत क्रियाशील झाले. सगळ्यांचे ध्येय एकच असले तरी मार्ग वेगवेगळे होते. काही सनदशीर राजकारणी तर काही जहाल मतवादी. सनदशीर राजकारण करणाऱ्यांमध्ये दादाभाई नौरोजी यांची राष्ट्रवादी विचारसरणी सकल राष्ट्रास मार्गदर्शक ठरलेली दिसते.

## आधुनिक भारताचे पितामह : दादाभाई नौरोजी

दादाभाई नौरोजी यांचा जन्म इ.स. १८२५ मध्ये मुंबई येथे एका पारशी आचार्यकुळात झाला. घरची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे उच्च पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी मोफत शिक्षण संस्थेमध्ये घेतले. इ.स. १८५४ मध्ये प्रोफेसर पद मिळालेले ते पहिले भारतीय होते. आपले शिक्षण देशवासीयांच्या पैशातून झाले असल्याने देशसेवा करून ऋण फेडणे आपले कर्तव्य आहे, असे त्यांचे मत होते.

जीवनाच्या प्रारंभापासूनच दादाभाई देशाच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय होते. त्यांनी मुंबई येथे ज्ञानप्रसारक मंडळ काढले. मुलींसाठी शाळा सुरू केली. १८५२ मध्ये मुंबईला स्थापन झालेल्या 'बॉम्बे असोसिएशन' या राजकीय संस्थेत दादाभाईंचा मोठा वाटा होता. आपल्या लंडनच्या मुक्कामात त्यांनी इंग्रजांना भारतीय समस्यांची जाणीव करून दिली. त्या उद्देशाने 'लंडन इंडियन असोसिएशन'ची स्थापना केली. त्यानंतर 'इस्ट इंडिया असोसिएशन' ही संस्था स्थापन केली. अशाप्रकारे विविध संस्थांद्वारे भारताच्या समस्यांकडे ब्रिटिशांचे लक्ष वेधण्याचा त्यांनी पुरेपूर प्रयत्न केला.

दादाभाई नौरोजी यांनी आपले संपूर्ण आयुष्य सनदशीर राजकारण करण्यात घालविले. त्यांचा इंग्रजांच्या न्यायबुद्धीवर विश्वास होता. त्यांच्यामते इंग्रज उदारमतवादी आहेत, इंग्लंडच्या राणीकडून आपण त्यांची प्रजा म्हणून सर्व अधिकार प्राप्त केले पाहिजे, जे इंग्रज आपल्याला नक्की देतील. ते म्हणत, 'भारताचे व इंग्लंडचे हितसंबंध परस्परविरोधी नसून परस्परपुरक आहेत. आपण जे योग्य व न्याय्य आहे, ते मागितले तर ब्रिटिश शासन ते दिल्यावाचून राहणार नाही.' दादाभाई नौरोजी हे सच्चे राजकारणी असल्याने आपल्या देशवासीयांचा फायदा होण्यासाठी अर्ज, विनंत्या करणे यात गैर काही नाही, अशी त्यांची विचारसरणी होती.

## नेमस्त उदारमतवादी विचारवंत

दादाभाईवर ब्रिटिशांच्या एकोणिसाव्या शतकातील उदारमतवादाचा प्रभाव पडला होता. सामाजिक व राजकीय प्रश्नांवर बुद्धीच्या भरवशावर मात करता येईल, हा विश्वास त्यांना वाटत होता. आपल्या देशातील समस्या, समाजव्यवस्थेतील तृटी, राज्ययंत्रणेतील कमतरता यांचा अभ्यास करून विकास साधण्यावर दादाभाईंचा भर होता. अर्थात ही प्रक्रिया क्रमाक्रमाने संथगतीने राबवणे आवश्यक होते. हा संयम दादाभाईमध्ये होता. लोकमत संघटित करून हिंदी लोकांचे हक्क व कर्तव्य कोणते, याची त्यांना जाणीव करून दिली. गव्हर्नरच्या सल्लागार मंडळात स्थानिक शासनसंस्थेतील जनतेचे प्रतिनिधित्व कशा स्वरूपात व किती प्रमाणात असावे, यासंबंधित चर्चा करून १ डिसेंबर १८६६ रोजी 'इस्ट इंडिया असोसिएशन' ही संस्था स्थापन केली. शासक व शासित संबंध सलोख्याचे राहावे, यासाठी ते प्रयत्नशील होते. भारतीय अडचणी व तक्रारींना त्यांनी व्यासपीठ मिळवून दिले.

## दादाभाईंचा स्वराज्यमंत्र

ब्रिटिशांचे खरे स्वरूप लक्षात आल्यावर दादाभाईंच्या उदारमतावरचा विश्वास कमी होऊ लागला. इंग्रजांचे राज्य भारतात स्थापन झाल्यावर येथील लघुउद्योग पार बसले. शासनात भारतीयांना उच्च अधिकारपदे मिळत नव्हती. इंग्रजांच्या अर्थव्यवस्थेमुळे भारतीयांचे शोषण होऊ लागले. जनता अधिकाधिक दारिद्र्यात लोटली जाऊ लागली. हे सर्व लक्षात आल्यावर आजपर्यंत स्वायत्तता व सुराज्य या मागण्या करणाऱ्या दादाभाईंनी आता स्वराज्याची मागणी करण्यास प्रारंभ केला. "भारतीय जनता जगो किंवा मरो; पण दरवर्षी ३ कोटी भारतातून इंग्लंडला पाठविणाऱ्या इंग्रजांच्या आर्थिक

शोषणातून मुक्त होण्याचा अंतिम उपाय म्हणजे स्वराज्य असून त्यासाठी चळवळ करा, चळवळ करा, अखंड चळवळ करा या मार्गाचा दादाभाई नौरोजींनी आक्रमक स्वरूपाचा राष्ट्रवादी संदेश भारतीयांना दिला."[१] लोकांनी आपणहून चालविलेले स्वराज्य आपणांस प्राप्त झाल्याखेरीज आपल्या उद्धाराचा दुसरा कुठलाही मार्ग नाही, असे नेटाने स्पष्टपणे व सोप्या भाषेत गहिवरून दादाभाई यांनी जेव्हा काँग्रेस सभेच्या व्यासपीठावरून अखेरीस सांगितले तेव्हा कोणी वृद्ध देवदूत आपल्या तरुण पिढीस शेवटचा उपदेश करण्याकरिताच अवतरला आहे की काय असा तिथे उपस्थितांना क्षणभर भास झाला.

## दादाभाईची ड्रेन थेअरी (आर्थिक नि:सारण सिद्धांत)

इंग्रजांनी ज्या वसाहतवादी धोरणाने भारतावर सत्ता प्रस्थापित केली, ती राबवत भारतातील साधनसंपत्ती काढून आपल्यावर देशात नेणे सुरू केले. त्यासाठी जो मार्ग अवलंबिला, त्याला आर्थिक नि:सारण असे नाव दिले आहे. "देशातील संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे जात असल्याने देश दरिद्री बनला असे मत त्यांनी आपल्या 'प्रॉव्हर्टी अँड अनब्रिटिश रुल इन इंडिया' या पुस्तकात मांडले. दादाभाईची ड्रेन थेअरी (संपत्तीचा निचरा) प्रसिद्ध आहे."[२]

भारत सरकारला इंग्लंडमध्ये बऱ्याच रकमा पाठवाव्या लागत. त्याला होम चार्जेस म्हणत. या पैशांच्या जोरावर इंग्लंडमधील कारखान्यात सोन्याचा धूर निघू लागला. भारत विपन्नावस्थेला पोचला. दादाभाईंनी या सर्व गोष्टींचे निरीक्षण केले. परकीय भांडवलाचे व्याज, त्यावरील नफा, देशात होणाऱ्या शेती व औद्योगिक उत्पन्नाची किंमत, आयातनिर्यात व्यापार या सर्वांची आकडेवारी देऊन त्यांनी शास्त्रशुद्ध विचार प्रथमच मांडला. इ.स. १८७१ मध्ये 'इस्ट इंडिया फिनान्स कमिटी' स्थापन झाली. त्यासमोर आपले विचार मांडतांना दादाभाई म्हणाले, 'हिंदी जनतेचे दरमाणशी वार्षिक उत्पन्न केवळ २० रुपये आहे. हे उत्पन्न सरकार तुरुंगामधील कैद्यांसाठी दरमाणशी जो खर्च करते, त्याहूनही कमी आहे. जनतेचे दारिद्र्य असेच वाढत गेले तर साम्राज्याची नौका याच खडकावर आदळून फुटणार.'

दादाभाईंचा आक्षेप ब्रिटिश भांडवलदारांनी भारतात व्यापार करण्यावर नव्हता. पण तसे करताना त्यांनी आपले स्वत:चे भांडवल आणावे, मग हवा तसा नफा मिळवावा, असे ते म्हणत. ब्रिटिशांनी भारतीयांच्या केलेल्या आर्थिक शोषणामुळे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अनेक वर्षे जो दुष्काळ पडला, त्यास तोंड देण्याची शक्ती भारतीय जनतेत राहिली नाही. यावर आक्षेप घेऊन दादाभाईंनी भारतीयांना ब्रिटिश साम्राज्याचे नागरिक म्हणून आम्हाला आमचा जन्मसिद्ध हक्क मिळाला पाहिजे, ही आणि इतर मूलभूत मागण्या केल्या, त्या अशा –

१. भारतीयांना सरकारी नोकरीत घेण्यात यावे. भारतीय चालीरीती, संस्कृती याबद्दल ज्ञान असल्यामुळे सर्व विभागांचे प्रशासन भारतीयांकडे सोपवावे.

२. प्रातिनिधिक शासनव्यवस्थेची स्थापना करावी, लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये सुधारणा करावी.

३. ब्रिटिशांनी भारतात निर्माण केलेल्या उद्योगधंद्याचा फायदा भारतीयांनाच मिळावा.

४. बिटिशांकडून होणारे आर्थिक, शारीरिक, मानसिक शोषण थांबवावे.

## नवराष्ट्राचे शिल्पकार

दादाभाई नौरोजी आधुनिक राष्ट्रावादाचे प्रणेते होते. ते नेमस्त वाटत असले तरी अन्यायाला प्रखर विरोध करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते. इंग्रज सरकारच्या अन्यायपूर्ण वर्तणुकीला कंटाळून त्यांनी स्वराज्याचे ध्येय स्वीकारले. लोकमान्य टिळकांनी काँग्रेसमध्ये जहालवादाचा आरंभ केल्यावर जहाल आणि नेमस्त असा विरोधाभास होऊन काँग्रेसमध्ये फूट पडू लागली. हे टाळण्यासाठी दादाभाईंनी बरेच प्रयत्न केले. राष्ट्रसभा मवाळांच्या हाती होती; पण जहालवाद्यांचे बळ एकसारखे वाढत होते. आपण सुचविलेला अध्यक्ष जहाल मान्य करतील याची मवाळांना खात्री नव्हती. जहालांना लोकमान्य टिळकांना अध्यक्ष करावयाचे होते. मवाळांनी जेव्हा दादाभाई नौरोजी यांना अध्यक्ष करायचे ठरवले, तेव्हा मात्र जहालांचा विरोध मावळला. पितामह दादाभाईंची निस्सीम देशभक्ती, स्वार्थत्याग व हिंदी राजकारणातील त्यांची कामगिरी इतकी महान होती की त्यांच्या उमेदवारीला कोणीच विरोध केला नाही. ८२ वर्षांच्या वृद्ध दादाभाईंचे अध्यक्षपद म्हणजे मवाळ व जहाल यांच्यातील तडजोड होती.

टिळकांना पत्र पाठवून जहालपणापासून परावृत्त करण्याचा दादाभाई नौरोजी यांनी प्रयत्न केला. त्यांनी पत्रात म्हटले, 'काँग्रेस आज मोडली तर ते हिंदुस्थानसाठी मोठे संकट असेल व अँग्लोइंडियन लोकांचा मोठा विजय असेल. पुढील राजकारणाच्या क्षेत्रात युद्ध करण्याचे राष्ट्रीय सभा हे आपले एक शस्त्र झाले पाहिजे. हळूहळू राष्ट्रसभेला सबल करणे हे आपले कर्तव्य आहे. "सी.वाय. चिंतामणी एकदा दादाभाईसंबंधी म्हणाले होते, भारताचे सार्वजनिक जीवन अनेक बुद्धिमान व निस्वार्थी नेत्यांनी अलंकृत केले आहे; पण आमच्या युगात कुणीही त्यांच्यासारखे नव्हते."[३]

अशाप्रकारे स्नेहभावाने राष्ट्रहित जोपासण्यासाठी दादाभाई प्रयत्नशील होते. देशासाठी कोणत्याही स्तरावर काम करण्याची त्यांची तयारी होती, म्हणूनच त्यांना नवराष्ट्राचे शिल्पकार, आधुनिक भारताचे पितामह म्हटले जाते.

## संदर्भ


१. कोंडेकर, ए.वाय., भारतीय राष्ट्रभावनेचा उदय व विकास, आधुनिक भारताचा इतिहास, निराली पब्लिशर्स, चौथी आवृत्ती, २००७, पृ. १५५

२. आठल्ये, डॉ. विभा, भारतीय राष्ट्रवादाचा उदय, भारताचा इतिहास (इ.स. १७०७ ते १८२५), अंशुल पब्लिकेशन्स, प्रथमावृत्ती, २०००, पृ. ४१३

३. वेल्हेकर, डॉ. एन.के., भारताचे प्रख्यात राष्ट्रीय पुढारी, आधुनिक भारताचा इतिहास, एस. चंद आणि कंपनी लिमिटेड, नवी दिल्ली, प्रथमावृत्ती, २००३, पृ.३८९


✠ ✠ ✠